# चोपडा नगरपरिषद चोपडा, जि. जळगांव

**CHOPDA MUNICIPAL COUNCIL, CHOPDA, DIST. JALGAON - 425107**
**Ph. (02586) 220016 Toll Free No.: 1800 233 5251 Fax: 220702**
**e-mail: co.mcchopda@gmail.com**

जा.क्र. २०२२-२०२३/आ.वि./कार्या.क्र.०१/२८६६ दि. १५/११/२०२२

## जाहीर सूचना

**चोपडा नगरपरिषद, चोपडा करीता कंत्राटी तत्वावर शहर समन्वयक (City Co-ordinator) पद भरती करणेबाबत.**

मा. राज्य अभियान संचालक सो.. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडील प्राप्त पत्राच्या अनुषंगाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० ची अंमलबजावणी करणे व त्याअंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामे करण्यासाठी शहर पातळीवर कंत्राटी तत्वावर शहर समन्वयक (City Co-ordinator) ची निव्वळ कंत्राटी पद्धतीने चोपडा नगरपरिषदमार्फत कंत्राटी स्वरुपात नियुक्त करण्याकरीता खालील पात्रता धारण करणारे उमेदवारांकडून दि. १६/११/२०२२ ते दि.२२/११/२०२२या कालावधीत अर्ज मागविणेत येत आहे.

| पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव | वयोमर्यादा | ठोक मानधन | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-ordinator) | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी i) बी.ई./बी.टेक. (कोणतीही शाखा) ii) बी. आर्क iii) बी. प्लॅनिंग iv) बी.एस.सी. (कोणतीही शाखा) | i)स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. ii)शहर समन्वयक च्या व्यतिरिक्त स्वच्छ सर्वेक्षण / घनकचरा व्यवस्थापन/पर्यावरण विभागात काम करण्याचा अनुभव | कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष (शहर समन्वय म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथील करता येईल.) | र.रु.४५०००/- प्रति माह | शहर समन्वयकाची नियुक्ती ही ११ महिन्यांपर्यंत राहील |

- वरील नमुद शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे निकष पुर्ण केलेल्या उमेदवारांचा अर्ज स्विकारणेत येतील याव्यतिरिक्त प्राप्त अर्ज निकाली काढले जातील.
- शहर समन्वयक (City Co-ordinator) पदासाठी पात्र उमेदवारास विहित अटी-शर्ती मान्य असल्याचा करारनामा करणे आवश्यक राहील.
- अर्ज करण्यासाठी अंतिम दि. २२/११/२०२२ (कार्यालयीन वेळेत)
- शहर समन्वयक (City Co-ordinator) ची नियुक्ती पुर्णतः कंत्राटी तत्वावर ठोक परिश्रमीकावरील असल्याने, नियमित शासकिय सेवेत समायोजनासंबंधीत कोणताही दावा पात्र उमेदवारास दाखल करता येणार नाही.
- या पदासाठी कोणतेही शासकिय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत तसेच कोणतेही प्रकारचे वेतन भत्ते वा इतर भत्ते अदा केले जाणार नाहीत.
- सदर नियुक्ती ही कागदपत्रांच्या प्रत्यक्ष तपासणीत शहर समन्वयक (City Co-ordinator) पदासाठी असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करीत असल्याची खात्री झाल्यानंतरच अंतिम केली जाईल.

स्वाक्षरीत/- **(हेमंत निकम)**
मुख्याधिकारी चोपडा नगरपरिषद, चोपडा